अग्निशमन आपत्कालिन सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान योजनेंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-अशसे-२०१८/प्र.क्र.६५/नवि-०४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ८ मार्च, २०१९

संदर्भ :-

१) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.अशस-४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२०, दिनांक ३१ ऑगस्ट,२००९
२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२७/नवि-२०,दिनांक १२ ऑगस्ट,२०१६
३) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.मअसे/३२-क/२०१८/२२८, दि.०६ मार्च,२०१८.
४) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.मअसे/३२-क/२०१९/२९३, दि. १५ फेब्रुवारी,२०१९.
५) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.मअसे/३२-क/२०१९/६१, दि. १० जानेवारी,२०१९.

प्रस्तावना :-

राज्यातील ड-वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा तसेच नगरपंचायती यांच्या अग्निशमन सेवेतील तूट भरून काढण्याकरिता व राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरिता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने दि.३१.०८.२००९ रोजी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अग्निसुरक्षा अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या सूत्राप्रमाणे ("ड"वर्ग महानगरपालिकांसाठी ३५ % शासन हिस्सा, "अ" वर्ग नगरपरिषदांसाठी ५०% शासन हिस्सा, "ब" वर्ग नगरपरिषदांसाठी ७०% शासन हिस्सा, तसेच "क" वर्ग नगरपरिषदांसाठी ८०% शासन हिस्सा) अनुदान देण्यासाठी संबंधित नगरपरिषदांकडून प्राप्त सविस्तर प्रकल्प अहवालांच्या छाननीअंती अनुदान वितरित करण्यात येते. संदर्भांकित शासन निर्णयान्वये नवीन निर्माण झालेल्या ड वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीचा समावेश महाराष्ट्र अग्निसुरक्षा अग्निसुरक्षा अभियानात करण्यात आलेला आहे. उपरोक्त संदर्भ क्र.३, ४ व ५ अन्वये संचालक,महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, यांनी शिफारस केल्यानुसार अनुक्रमे अंबरनाथ नगरपरिषद,जि.ठाणे,मुक्ताईनगर नगरपंचायत,जि.जळगाव व धडगाव नगरपंचायत,जि. नंदुरबार यांचा महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत समावेश करून त्यांच्या शासन हिश्श्याची रक्कम वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत **अंबरनाथ नगरपरिषद,जि.ठाणे, मुक्ताईनगर नगरपंचायत,जि.जळगाव व धडगाव नगरपंचायत, जि.नंदुरबार** यांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे **रु. २.२३ कोटी** इतका निधी मंजुर करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना नियंत्रक अधिकारी तसेच संबंधित सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी आहरीत करुन संबधीत मुख्याधिकारी यांना वितरित करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

३. सदर अनुदान वाचा क्र.(१) व (२) येथील शासन निर्णयातील इतर अटी व शर्तीच्या अधीन राहुन वितरीत करण्यात येत आहे.

४. सदर कामासाठी येणारा खर्च “एफ-२, २२१७, नगर विकास, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००)(५३) राज्यातील नगरपरिषदांना अग्निशमन सेवा व आणीबाणीच्या सेवांच्या बळकटीकरणासाठी सहाय (२२१७ ३२१५) ३१, सहाय्यक अनुदान (वेनतेतर)” या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करून देण्यात आलेल्या सन २०१८-१९ च्या मंजूर अनुदानमधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग,शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार विनियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-पाच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र. १३४ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२ एप्रिल, २०१८ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ मधील तसेच परिशिष्टातील अ.क्र.८ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०३०८११२५४१९०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sharad Kirwale

Digitally signed by Sharad Kirwale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ed23302d612eecfa1f6e35cc7ef096ce9dc6a6c617b767e8f74743b779e2b96, cn=Sharad Kirwale
Date: 2019.03.08 12:55:07 +05'30'

(शरद किरवले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
८) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई/ नागपूर
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०) आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद संचालनालय,वरळी,मुंबई.
११) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१२) संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई
१३) अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई
१४) संचालक, अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.
१५) मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद,जि.ठाणे/मुक्ताईनगर नगरपंचायत,जि.जळगाव / धडगाव नगरपंचायत,जि. नंदुरबार.
१६) कक्ष अधिकारी (व्यय-३) / (अथसंकल्प-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) कक्ष अधिकारी (नवि-२९)/(नवि-३१), नगर विकास, विभाग,मंत्रालय, मुंबई
१८) निवडनस्ती, (नवि-०४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र. असशो-२०१८/प्र.क्र.६५/नवि-०४,दिनांक ८ मार्च ,२०१९ चे सहपत्र.

(रुपये लाखात)

अ.क्र.	नगरपरिषद	अग्नीशमन केंद्रासाठी अनुज्ञेय अनुदान	नगरपरिषद/ नगरपंचायत हिस्सा	शासन हिस्सा
१	२	३	४	५
१	अंबरनाथ नगरपरिषद,जि.ठाणे,	१९०	९५	९५
२	मुक्ताईनगर नगरपंचायत,जि.जळगाव	८०	१६	६४
३	धडगाव नगरपंचायत,जि.नंदुरबार	८०	१६	६४
एकुण		**३५०**	**१२७**	**२२३**

Sharad Kirwale

Digitally signed by Sharad Kirwale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ed23302d612eecfa1f6e35cc7ef096ce9dc6a6c617b767e8f74743b779e2b96, cn=Sharad Kirwale
Date: 2019.03.08 12:55:38 +05'30'

(शरद किरवले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

****